**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ४०/२०१७-१८/ 369 दिनांक: १[illegible]-१२-२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ४० /२०१७-२०१८**

| | |
|---|---|
| श्री उमर मिरा शेख<br>मु.पो. प्रतापपूर ता. जत जि. सांगली | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभाग कवठे महांकाळ<br><br>३) उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग जत | **विरुध्द पक्षकार** |

**कोरमः-** १.श्री ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही.देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

12/12/2017

1

## तक्रारीचे स्वरुप व ग्राहकाची मागणी

तक्रारदार श्री उमर मिरा शेख, मु.पो. प्रतापपूर ता. जत. जि. सांगली येथील असून त्यांचा विज ग्राहक क्र. २७०६८०००२३४४-७ आहे. त्यानी "महावितरण आपल्या दारी " योजने अतर्गत दि. २३.०१.२०१३ रोजी पैसे भरुन विज केबलद्वारे कनेक्शन घेतले आहे. त्यांचे विज कनेक्शन हे केबल टाकून देण्यात आले आहे परंतु २०१७ पर्यन्त देखिल एल.टी लाईनचे काम केले गेले नाही. त्यामुळे एल.टी. लाईन टाकून त्यावरुन विद्युत पुरवठा देणे बाबतची त्यांची मागणी आहे. यापूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे त्यानी दि. १०.०७.२०१७ रोजी तक्रार दाखल केली व सांगली कक्षांने दि. ०८.०९ .२०१७ रोजी दिलेल्या आदेशाने समाधान न झाल्यामुळे दि. ०९.०९.२०१७ रोजी त्यांनी हया मंचाकडे तक्रार दाखल केली.

श्री उमर मिरा शेख मु.पो. प्रतापपूर ता. जत हयांनी शेती पंप विज पुरवठा मिळणेकरिता दि. २५.०१.२०१३ रोजी पावती क्र. ५२८७४६० ने रु. ५,०५०/- चा भरणा केला असून, दि. ०८-०३-२०१३ रोजी त्यांच्या मागणीनुसार, महावितरण आपले दारी हया योजने अंतर्गत, केबल कनेक्शन दिलेले असून, त्यांच्या ग्राहक क्र. २७०६८०००२३४४-७ असा आहे. त्यांच्या , विज पुरवठा करणे करिता दोन(२) पोलची आवश्यकता आहे. त्यांस कनेक्शन दिल्यामुळे त्यांचे नाव जेष्ठता यादीमधून गेलेले आहे. सध्या दिनांक ३१.०३.२०१३ पर्यन्तची कनेक्शनची कामे पूर्ण झालेली आहेत. पुढील कामे प्रलंबित आहेत. परंतु तक्रारदाराचे नाव जेष्ठता यादीत नसल्याने त्यांचे काम झालेले नाही. सदरचे काम करण्याकरिता पायाभूत आराखडा-२ अंतर्गत सदर काम करणेस विभागीय कार्यालयाकडून आदेश प्राप्त झालेनंतर ठेकेदाराकडून सदरचे काम पूर्ण करुन घेणेत येईल. तसेच निधी उपलब्ध झाल्यानंतर प्राधान्य क्रमानुसार त्यांची लघुदाब वाहिनी उभा करुन देण्यात येईल.

सदर तक्रारीची सुनावणी दि. १२.१२.२०१७ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे घेण्यात आली. सुनावणी दरम्यान ग्राहक स्वत: व वि.प. तर्फे श्री पी.आय. राठोड , उपकार्यकारी अभियंता जत उपविभाग उपस्थित होते.

## वितरण कंपनीची भूमिका

१) ग्राहकाला केबलच्या ऐवजी ०.१२ कि.मी. एल.टी. लाईन वरुन विद्युत पुरवठा देणे योग्य होईल काय?

उत्तर:- होय

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तर:- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

ग्राहकाला केबलने ४ वर्षा पासून विज पुरवठा "महावितरण आपल्या दारी" या योजने अंतर्गत देण्यात आला आहे. सबब मागणी प्रमाणे ग्राहकास त्वरीत एल.टी.लाईन वरुन विज पुरवठा चालू करुन द्यावा असे मंच सूचित करीत आहे. सुनावणी दरम्यान नुकसान भरपाई बद्दल ग्राहकाने कुठलाही प्रश्न उपस्थित केलेला नाही.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

12/12

## आदेश

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे ०.१२ कि.मी. 3- फेज 4-वायर लाईन टाकून ०१.०२.२०१८ पर्यन्त त्यावरुन विज पुरवठा देण्यात यावा.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

12/12/2017

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. बुरांडे) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण